SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

विद्यार्थी विकास विभाग

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ : जा. क्र.शिवाजी वि/ विद्यार्थी विकास /४७७ दि. ०९/०७/२०२६

प्रती,

१) मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२) मा. अधिविभाग प्रमुख / संचालक/ समन्वयक
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : <u>अविष्कार संशोधन स्पर्धेची माहिती विद्यार्थ्यांना होणेसाठी ज्या त्या जिल्ह्यात जिल्हास्तरीय एकदिवशीय कार्यशाळा आयोजनाबाबत .</u>

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा २०२६ – २०२७ चे ऑक्टोबर २०२६ मध्ये आयोजन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अविष्कार संशोधन स्पर्धेचे नियम व इतर अनुषंगिक माहिती होण्यासाठी या विभागामार्फत कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यामध्ये खालील तक्त्यात नमूद केलेल्या महाविद्यालयामध्ये अविष्कार कार्यशाळेचे आयोजन केले आहे. **<u>सदर कार्यशाळा सकाळी ०९.०० ते सांयकाळी ५.०० या कालावधीत</u>** होणार आहे.

| अ.क्र. | जिल्हा | आयोजक महविद्यालयाचे नाव | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सातारा | आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा | २२ जुलै, २०२६ |
| २. | कोल्हापूर | राजर्षी छत्रपती शाहु कॉलेज, कोल्हापूर | २३ जुलै, २०२६ |
| ३. | सांगली | व्ही. पी. इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, सांगली | २४ जुलै, २०२६ |

तरी सदर एकदिवशीय कार्यशाळेसाठी ज्या त्या जिल्ह्याच्या ठिकाणी आपल्या महाविद्यालयातील सहा विद्यार्थी (विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून ) व अविष्कार काम पाहणारे दोन शिक्षक यांना उपस्थित रहाणेबाबत सांगण्यात यावे. सोबत कार्यक्रम पत्रिका जोडली आहे. त्यानुसार उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांनी कार्यशाळा संपेपर्यंत उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

सदर दोन शिक्षकामधील एक शिक्षक अविष्कार समन्वयक असणे आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयात ज्या शाखा शिकवल्या जातात, त्या प्रत्येक शाखेतील एक ते दोन विद्यार्थी कार्यशाळेसाठी घेण्यात यावेत. कार्यशाळेसाठी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांची नावे खाली दिलेल्या **गुगल फॉर्ममध्ये दि. १८/०७/२०२६** पर्यंत भरण्यात यावीत हि विनंती. अविष्कार कार्यशाळेसाठी उपस्थित रहाणेसाठीचा प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयांनी करणेचे आहे.

**गुगल लिंक** : https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScOllQd7E8BoRoLAvaQS-T6zrcdcRLmptJ-YaiS811IHZDs3g/viewform?usp=header

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
विद्यार्थी विकास

टिप : ज्या महाविद्यायांना वरील ठिकाणी येणेस अडचण असेल त्यांनी वरील पैकी कोणत्याही एका जिल्ह्यातील सोईच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

### जिल्ह्यास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळा

## कार्यक्रम पत्रिका

| तपशील | वेळ |
|---|---|
| नोंदणी | सकाळी ०९. ०० ते १०.०० |
| उद्धाटन | सकाळी १०.०० ते ११.०० |
| पहिले सत्र | सकाळी ११.०० ते ०१.०० |
| चर्चा | दुपारी ०१.०० ते ०१.३० |
| भोजन | दुपारी ०१.३० ते ०२.३० |
| दुसरे सत्र | दुपारी ०२.३० ते ०४.०० |
| चर्चा | दुपारी ०४.०० ते ०४.३० |
| समारोप | सायंकाळी ०४.३० ते ०५.०० |

— ० —